**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०९ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **उद्योगांत वाढ आणि नवीन रोजगार निर्मिती हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचं अभिभाषणात प्रतिपादन.**
2. **राज्य विधानसभेत महायुती सरकारवरचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानानं मंजूर; विधानसभेच्या अध्यक्षपदी भाजपचे राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड.**
3. **2022-2023 या वर्षासाठीच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांत गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा पंचायत गटाला सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर.**
4. **विदर्भात थंडी परतणार, आगामी काही दिवसांत किमान तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअस घट अपेक्षित.**

---------------------------------------

**राज्यपाल अभिभाषण**

**आज विधिमंडळाला राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी संबोधित केलं. हे सरकार महात्मा गांधी, महात्मा फुले, शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शावर आपला कारभार चालवेल असा निश्चय त्यांनी प्रतिपादित केला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे आता देशात अनेक ठिकाणी या भाषेची केंद्र स्थापन करून त्याचा विशेषत्वाने अभ्यास करणे शक्य होणार आहे, यामुळे साडेचारशे विद्यापीठांमध्ये मराठी भाषेचा अभ्यास उपलब्ध होणार असून यासाठी केंद्र सरकारतर्फे निधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. आपले राज्य हे परकीय थेट गुंतवणुकीसाठी पहिल्या पसंतीचे राज्य असल्याचं सांगून इथं मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करण्याचं सामर्थ्य असल्याचं त्यांनी म्हटलं. उद्योगांत वाढ आणि नवीन रोजगार निर्मिती हे आपल्या सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं राज्यपाल म्हणाले -**

*My government has set a very ambitious target of making Maharashtra first state in the country to achieve a one trillion US dollar economy by the year 2027- 28. My government has announced their policy of giving status to mega projects in the first*

*sector and the Hi-Tech manufacturing sector. The Approved project in the last 8 months under the said policy will attract total investment of approximately 3,29,000 crore and it will generate direct and indirect employment of 1,18,000.*

**पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत राज्यांने साडे 19 लाखांपेक्षा अधिक घरे मंजूर केली आहे. याचा लाभ समाजातील कमी आणि मध्यम उत्पन्न गटाच्या नागरिकांना होत असल्याचं ते म्हणाले. राज्यपालांनी विविध सरकारी योजनांच्या अंमलबजावणी आणि यशस्वीतेचा आढावा घेतानाच, रस्ते, पायाभूत सुविधा यामध्ये होत असलेल्या विकासाबद्दल देखील आपल्या अभिभाषणातून समाधान व्यक्त केलं.**

---

**राहुल नार्वेकर**

**राज्य विधानसभेच्या अध्यक्षपदी भाजपचे राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि अजित पवार यांनी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला होता. त्याला इतर सदस्यांनी अनुमोदन दिलं. त्यानंतर नार्वेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नार्वेकर यांचं अभिनंदन केलं. त्यांच्या रुपाने न्यायप्रिय आणि संयमी व्यक्तिमत्व निवडलं गेलं आहे, ही आनंदाची बाब असल्याचं ते म्हणाले. आपल्याकडे विधानसभा अध्यक्ष बिनविरोध निवडण्याची परंपरा असून, ही परंपरा कायम राहिली असं फडणवीस यांनी नमूद केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह काँग्रेसचे नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी देखील नार्वेकर यांचं अभिनंदन करुन त्यांच्या कार्याचा गौरव केला. विधानसभेच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा निवडून येणारे अॅड. राहुल नार्वेकर हे संयुक्त महाराष्ट्राचे दुसरे अध्यक्ष असतील. यापूर्वी ज्येष्ठ नेते बाळासाहेब भारदे हे १९६२ आणि १९६७ असे दोन वेळा अध्यक्ष झाले होते. सयाजी सिलम हेही दोन वेळा अध्यक्ष होते, पण त्यांचा एक कार्यकाळ हा संयुक्त महाराष्ट्र होण्याआधीचा होता. संयुक्त महाराष्ट्रात विधानसभा अध्यक्षपद काँग्रेसकडे ११ वेळा, राष्ट्रवादीकडे तीन वेळा, भाजपकडे दोन वेळा, तर शिवसेनेकडे एकवेळा राहिले आहे. आता भाजपला तिसऱ्यांदा हे पद मिळाले आहे.**

---

**विश्वासदर्शक ठराव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा विश्वासदर्शक ठराव आज विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाला. विधानसभा सदस्य उदय सामंत, दिलीप वळसे पाटील, संजय कुटे आणि रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमडळावर विश्वास दर्शवणारा ठराव सभागृहात मांडला होता, तो सभागृहाने मतदानाने एकमताने मंजूर केला. त्यानंतर विधानसभेचं कामकाज स्थगित करण्यात आलं. दरम्यान, विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाली असली, तरी आता विरोधी पक्षाबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

---------------------------------------

संजय मल्होत्रा

मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने महसूल सचिव संजय मल्होत्रा यांची 11 डिसेंबर 2024 पासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे पुढील गव्हर्नर म्हणून नियुक्ती केली आहे. ही माहिती डीडी न्यूजच्या एक्स समाजमध्यमावरुन घेण्यात आली आहे.

---------------------------------------

संसद

विविध कारणांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे आजही वारंवार अडथळे निर्माण झाल्याने संसदेचं कामकाज तीन वेळा तहकूब झालं. लोकसभेत आज विरोधी पक्षांनी एका खाजगी उद्योग समूहाच्या तथाकथित लाचखोरीच्या आरोपांवरून गदारोळ केला. प्रश्नोत्तराच्या तासात इतर मुद्दे उपस्थित करता येणार नाहीत, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सांगितल्यावर गदारोळ वाढला, त्यामुळे लोकसभेचं कामकाज आज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

---------------------------------------

निर्मला सीतारामन

दरम्यान, देशातल्या आदिवासी भागांच्या विकासासाठी नाबार्डकडून निधी पुरवला जात असून गेल्या १८ वर्षांत १ हजार २९ प्रकल्प मंजूर झाले असल्याचं आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितलं. आदिवासी विकास निधी योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या या निधीतून आतापर्यंत ६ लाखांहून अधिक कुटुंबांना लाभ मिळाला असल्याचं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------

लाडकी बहीण /अदिती तटकरे

विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्र सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना' सुरू केली होती. या योजनेअंतर्गत महिलांच्या खात्यामध्ये दरमहा १५०० रुपये जमा केले जात होते. त्यांनतर आता पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं आहे. त्यामुळे आता महिलांच्या खात्यावर महायुती सरकारकडून २१०० रुपये देण्यात येणार आहे. या योजनेतील लाभार्थी महिलांच्या तक्रार आलेल्या अर्जांची छाननी होऊन लाभार्थी महिलांची संख्या कमी होणार असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. याबाबत राज्याच्या माजी महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी या सर्व चर्चा फेटाळत अशी छाननी करण्याचा सरकारचा विचार नसल्याचं स्पष्ट केलं आहे. "लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये छाननी करण्याचा आमचा कोणताही विचार नाही. छाननीबाबत चुकीची चर्चा सुरू आहे. राज्यातील २ कोटी ४० लाखांपेक्षा अधिक महिलांना या योजनेअंतर्गत लाभ मिळत असून आम्ही सर्व पडताळणी करूनच लाभार्थी महिलांचा या योजनेत समावेश केला आहे," असं तटकरे यांनी स्पष्ट केलं.

-------------------------------------

राष्ट्रीय पंचायत पुरस्कार

केंद्रीय केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाने 2022-2023 या वर्षासाठीच्या प्रतिष्ठित राष्ट्रीय पंचायत पुरस्कार प्राप्तकर्त्यांची घोषणा केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते येत्या 11 डिसेंबर रोजी नवी दिल्ली इथं राष्ट्रीय पंचायत पुरस्कार करणार प्रदान करण्यात येणार असून पुरस्कारप्राप्त पंचायती राज संस्थांमध्ये महाराष्ट्रातील एकूण 6 आस्थापनांचा समावेश आहे, ज्यात 4 ग्रामपंचायती, 1 पंचायत गट तर एका संस्थेचा समावेश आहे. यामध्ये सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मान्याची वाडी ग्रामपंचायतीने सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार तसेच ग्राम ऊर्जा स्वराज विशेष ग्राम पंचायत अशा दोन पुरस्कारांवर आपलं नाव कोरल आहे. तर, गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा पंचायत गटाला सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय, नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी गट अंतर्गत मोडाळे ग्रामपंचायतीला स्वच्छ आणि हरित ग्राम पंचायत हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. याव्यतिरिक्त, भंडारा जिल्ह्यातील बेला ग्रामपंचायतीला कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत पुरस्कारा अंतर्गत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात येईल. यासोबतच पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी या संस्थेलाही पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था पुरस्कार श्रेणीतील तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात येणार आहे. यावर्षी राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांच्या स्पर्धेत देशभरातील 1.94

लाख ग्रामपंचायती सहभागी झाल्या होत्या. त्यामधील 42 पुरस्कारप्राप्त पंचायतींपैकी 42% पंचायती या महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत.

-----------------------------------------

**स्मार्ट इंडिया हक्केथॉन**

सातवे स्मार्ट इंडिया हक्केथॉन येत्या 11 डिसेंबरपासून देशभरातील 51 केंद्रांवर सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण हा या देशव्यापी उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमात विविध विद्यार्थी संघ, बहुविध मंत्रालय, विभाग आणि उद्योगांनी दाखल केलेल्या समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न करतील. यावर्षी, 54 मंत्रालये, विभाग, राज्य सरकारे, सार्वजनिक उपक्रम आणि उद्योगांनी 250 हून अधिक समस्या विधाने सादर केली आहेत, ज्यामुळे संस्था स्तरावर, अंतर्गत हक्काथॉनमध्ये 240 टक्क्यांनी वाढ झाली आहे. नागपूरच्या जी एच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा यात समावेश आहे.

-----------------------------------------

**हवामान**

फेंगल चक्रीवादळाचा प्रभाव ओसरल्यामुळे नागपूरसह विदर्भात किमान तापमानात घट दिसून येत आहे. गेल्या 24 तासात चंद्रपूर इथं सर्वात कमी 15 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. गडचिरोली आणि अमरावती जिल्ह्यात 15.4 तर नागपूर जिल्ह्यात 16 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भातील उर्वरित सर्व जिल्ह्यात तापमान 16 ते २० अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी तीन ते चार दिवसात तापमानात आणखी दोन ते तीन अंशांची घट होण्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. या दरम्यान हवामान कोरडं राहणार आहे.

*****